


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# अनुसूचित जमातींच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन (विशेष संदर्भ: नंदुरबार (महाराष्ट्र) व बडवानी (मध्य प्रदेश) जिल्हा)

**साळुंके गौरी सुकदेव**
संशोधक विद्यार्थीनी,
अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त),
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.
**डॉ. के. पी. देशमुख**
मार्गदर्शक,
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
महागाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**गोषवारा:**

जगभरात ज्ञानाचा समाज उदयाला येत आहे. अलिप्तता आणि एक अद्वितीय सांस्कृतिक स्तर असलेल्या आदिवासींचा आणि भारताच्या राष्ट्रीय जीवनात त्यांची जनसांख्यिकीय भूमिका परिभाषित असलेल्या भारतीय इतिहासात त्याला विशेष स्थान आहे. यांचा एक समृद्ध असा वारसा आहे. परंतु गरिबी, उपासमार, अंधश्रद्धा आणि निरक्षरता हे अजूनही गंभीर प्रश्न आहेत. मनुष्याची बुद्धिमत्ता हा सर्वात मोठा खजिना आहे. आदिवासी लोकांपेक्षा गैर-आदिवासी लोक सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अधिक चांगले विकसित झाले आहेत. जमातीचे सदस्य त्यांच्या प्राचीन, सर्वांगीण जीवनशैलीचा पाठपुरावा करत राहतात आणि त्यांच्या परंपरांपासून दूर राहणे त्यांना आवडत नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की आधुनिक संस्कृतीचा जमातींवर कोणताही परिणाम झाला नाही. सरकारच्या कायदेशीर गरजा, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण या सर्वांचा तेथील वनजीवनावर लक्षणीय परिणाम झाला आहे. मात्र, परिवर्तनाची प्रक्रिया संथ गतीने घडते. या संशोधन पत्रात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे. द्वितीय स्त्रोतांचा वापर करुन तसेच नंदुरबार व बडवानी या जिल्ह्यांपुरती मर्यादित ठेऊन संशोधकाने अधिप्रमाणित संदर्भाचा वापर करुन तथ्य विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच काही समस्या सुचविण्याचा ही प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**

जागतिक पातळीवर वेगाने वाढणाऱ्या कांही मोजक्या अर्थव्यवस्थामध्ये भारतीय अर्थव्यवस्था गणल्या जाते. मागील ७५ वर्षाच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेने मागासलेल्या अर्थव्यवस्थेकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे वाटचाल केली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर हा ६ टक्क्यापेक्षा अधिक वेगाने होत आहे परंतु या विकास प्रक्रियेत देशातील आदिवासी समुदायाची स्थिती काय आहे हे बघितले असता विकासाच्या सर्वच निदर्शाकात हा समुदाय हा खूपच मागास असलेला दिसतो. देशातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा विकास झाला का बघितला असता देशातील सर्वच आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यात आदिवासी लोकसंख्या ही महास्लेलीच राहिली असल्याची दिसते. यात प्रातिनिधिक स्वरुपात सर्वाधिक अनुसूचित जमातींची लोकसंख्या असलेले मध्य प्रदेश राज्यातील बडवानी जिल्हा आणि अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या महाराष्ट्रात राज्यातील नंदुरबार जिल्हे जे की अदिवासी बहुल लोकसंख्या असलेले जिल्हे आहेत या जिल्ह्यात आदिवासी विकासाच्या भरपूर योजना वापरून ही हे जिल्हे अजूनही विकासाच्या प्रक्रियेत कुठे आहेत हे पाहण्यासाठी या जिल्ह्याची सामाजिक आर्थिक ब्काही निदर्शाके घेऊन देशाशी तुलना करण्याचा प्रयत्न सदरील संशोधन पेपर मध्ये केला आहे. 1950 मध्ये भारतीय संविधानाद्वारे आदिवासींना मूलभूत अधिकाराद्वारे जमातींना संरक्षण देण्यात आले असले तरीही त्यांची आजही निम्म्याहून अधिक लोकसंख्या ही दारिद्र रेषेखालील आहे. या समुदायाच्या शिक्षण, आरोग्यविषयक, दरडोई उत्पन्न, या बाबतीत राष्ट्रीय पातळीवर या समुदायाचे स्थान काय आहे याचा अभ्यास येथे केला जाणार आहे.

**प्रमुख शब्द (KEY WORDS):-** अनुसूचित जमाती, सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक

**साहित्याचे पुनरावलोकन:-**

**१)पवार सुरेश कृष्णा (2012),** महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येची सामाजिक आर्थिक स्थिती भौगोलिक विश्लेषण :-यांनी आपल्या शोध प्रबंधात आदिवासींची सामान्य वैशिष्ट्ये सांगितली आहेत. दुर्गम भागात राहणारे, आदिवासी बोली बोलणारे, शिकार करणे, शेती करणे, वनोपज गोळा करणे इ. तसेच या लोकांची मुख्य समस्या निरक्षरता आहे. शिक्षणाच्या बाबतीत आदिवासींचे लोकसंख्येचे प्रमाण जिथे जास्त आहे तेथे त्यांची साक्षरता कमी आहे. पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या शिक्षणात तर हे प्रमाण अगदी नगण्य आहे. तर महिला साक्षरतेच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल खूप आहे.[१]

**२)आर.आर. बागुल (2017),** नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोकांमधील पोषण स्थिती आणि आरोग्य धोक्यांवर भौगोलिक प्रभाव (महाराष्ट्र राज्य):- चांगले पोषण हा आरोग्याचा मूलभूत घटक आहे परंतु, आदिवासी गटांना भेडसावणाऱ्या अनेक आरोग्य समस्यांपैकी कुपोषणाची समस्या ही आदिवासी समाजाच्या सामाजिक-आर्थिक अव्यवस्थेचा थेट परिणाम आहे असे बागुल यांनी आपल्या शोधनिबंधात म्हटले आहे.[२]

**३)जितेंद्रसिंह धुर्वे (2022),** नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण आणि मध्य प्रदेशातील अनुपपूर जिल्ह्यातील आदिवासी लोकांवर त्याचा प्रभाव:- या शोधनिबंधात धुर्वे यांनी सांगितले की, आदिवासी हे भारतातील मूळ निवासी आहेत. आदिवासींची स्वतःची संस्कृती, धार्मिक प्रथा, सण, गाणी, संगीत, नृत्य, वेशभुषा, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, त्यांच्या समस्या, उदरनिर्वाहाचे साधन, जीवनशैली यात जवळजवळ साधर्म्य आढळते. दक्षिण आफ्रिकेनंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा आदिवासी लोकसंख्या असलेला देश आहे. आदिवासी आणि जंगल यांचे जवळचे नाते आहे.[३]

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) नंदुरबार जिल्हा व मध्यप्रदेशातील बडवानी जिल्ह्यांचा सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे .

२)महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा व मध्यप्रदेशातील बडवानी जिल्ह्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीची भारताशी तुलना करणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

१)आर्थिक व सामाजिकदृष्टया नंदुरबार व बडवानी हे दोन्ही जिल्हे अतिमागास व अविकसित आहेत.

२) भारत देशाच्या सरासरी उत्पन्नापेक्षा नंदुरबार व बडवानी जिल्ह्याचे सरासरी दरडोई उत्पन्न कमी आहे.

**संशोधनाची व्याप्ती /मर्यादा:-**

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन्ही राज्यात अनुसूचित जमातींची संख्या मोठया प्रमाणात आढळते.संशोधनाची मर्यादा ठरविताना संशोधकाने या दोन्ही राज्यातील अनुक्रमे नंदुरबार व बडवानी या आदिवासी बहुल जिल्ह्यांचा अभ्यास केला आहे.

**संशोधनाची पद्धत:-**

महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा व मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यांचा अभ्यास करताना संशोधकाने विश्लेषणात्मक, गुणात्मक तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तर सामग्री साठी दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे, त्यात वर्तमानपत्रे, डायरी, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मासिके, सरकारी अहवाल, वेबसाईटचा उपयोग केला आहे.

**तथ्य विश्लेषण:-**

"जमाती" हा शब्द अनेक नावांनी ओळखला जातो. विशेषतः "प्राचीन निवासी" म्हणून आदिवासी हा शब्द रुढ झाला जो राष्ट्रीय जनगणनेनुसार वर्गीकृत आहे आणि जमाती म्हणून सूचीबद्ध आहे. ब्रिटिश वांशिक शास्त्रज्ञांनी आदिवासींना "अनिमिस्ट" म्हणून संबोधले. तर भारतात इतरत्र "स्वदेशी" (इंडिजियस) म्हणून ओळखले जातात. सामान्यतः आदिवासी समाज हा सामान्य संस्कृती, विशिष्ट बोली बोलणारा, कलात्मक परंपरा आणि सामाजिक चालीरीती, आर्थिक दृष्ट्या मागासलेला, दऱ्याखोऱ्यात वसलेला आणि सुसंस्कृत समाजापासून दूर प्रदेशात विरळ राहतो. NFHS-4 च्या आकडेवारीनुसार, मध्य प्रदेशात सामान्य लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी लोकसंख्येमध्ये IMR दरांमध्ये कमालीचे अंतर आहे. मध्य प्रदेशातील जमातींसाठी IMR दर सामान्य लोकसंख्येच्या 70 टक्के आहेत, ज्याचा अर्थ असा आहे की राज्यांच्या लोकसंख्येच्या एक चतुर्थांश मुलांचा योग्य आरोग्य सेवेच्या अभावामुळे मृत्यू होण्याची शक्यता 70 टक्के जास्त आहे.[४]

नंदुरबार व बडवाणी या दोन्ही जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी शहरी व ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात मोठी तफावत दिसून येते. बहुतांश लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्य करताना शासकीय अहवालाच्या आकडेवारीनुसार दिसून येते. तसेच अनुसूचित जमातींची लोकसंख्या ही निम्म्याहून अधिक आहे, त्यामुळे नंदुरबार व बडवानी हे दोन्ही जिल्हे आदिवासीबहुल जिल्हे आहेत.[५] जिल्हा सामाजिक व आर्थिक समलोचन २०२२ नुसार नंदुरबारची अनुसूचित जमातींची दारिद्र्य रेषेखालची कुटुंबांची टक्केवारी ७२% असून दरडोई उत्पन्न ६८,००० रुपये इतके आहे.[६] बडवानी जिल्ह्याची ६१.६६% अनुसूचित जमातींची लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील आहे व तेथील दरडोई उत्पन्न ७१,१४७ रुपये इतके आहे.

मध्यप्रदेशातील बडवानी जिल्हा हा भारताच्या MPI च्या ३ मानकानुसार (शिक्षण, आरोग्य, राहणीमान) मध्य प्रदेशातील तिसऱ्या क्रमांकाचा गरीब जिल्हा आहे. सामाजिक दृष्टीने पाहिले असता, बहुसंख्य आदिवासी हे कृषीवर आधारित आपलं जीवन व्यतीत करतात. त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत कृषी हा असून त्यात मजुरी, वन

उत्पादन गोळा करणे, मध गोळा करणे इ. त्यांच्या उत्पन्नाची साधने आहेत. तर तक्त्यानुसार औद्योगिक क्षेत्रात अगदीच नगण्य प्रमाण आढळून येते. बडवानी जिल्ह्यात बालविवाह सारख्या घातक समस्येचे प्रमाण ५०.३% आहे.[७]

| नंदुरबार व बडवाणी जिल्ह्यातील अनुसूचित जमातींचे आर्थिक सामाजिक स्थिती चे तुलनात्मक विश्लेषण | | | | |
|---|---|---|---|---|
| **समस्या** | **तपशील** | **नंदुरबार (महाराष्ट्र)** | **बडवानी (मध्यप्रदेश)** | **भारत** |
| **लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये २०११** | १)एकूण लोकसंख्या | १६,४८,२९५ | १३,८५,८८१ | १२१.०८ कोटी |
| | २)शहरी लोकसंख्या **(%)** | १६. ७१ % | १४. ७३% | ३९.१६% |
| | ३)ग्रामीण लोकसंख्या **(%)** | ८३.२९% | ८५.२७% | ६८.८४% |
| | ४)अनुसूचितजमातीची लोकसंख्या **(%)** | ६९.२८% | ६९.४२% | ८.६०% |
| | ५)दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची **(%)** | ७२.००% | ६१.६६% | ४५.३% |
| **आर्थिक** | १)सरासरी दरडोई उत्पन्न **(रुपयात)** | ६८,००० | ७१,१४७ | १४३००० |
| | २)कृषी क्षेत्र जमीन **(हेक्टर)** | ३,६१,००० | २३,००९(४९.५१%) | १६० दशलक्ष |
| | ३)औद्योगिक क्षेत्र **(हेक्टर)** | **३** | १६७ (०.०३४%) | ६६२७३.८२ हजार |
| **शैक्षणिक** | १)साक्षरतेचे प्रमाण **(%)** | ६४. ३८% | ४९.०८% | ५९.०० % |
| | २) महिला साक्षरतेचे प्रमाण **(%)** | ५६.५०% | ३२.५०% | ४९.४०% |
| | ३) शिक्षणातील गळतीचे प्रमाण **(%)** | ३९.४१% | N.A. | **६२.४०%** |
| **आरोग्य** | १)बालमृत्युदर **(दर हजारी)** | **२५२** | ६८ | २५.५०% |
| | २)बालविवाह (%) | १८.९६% | ५०.३०% | १६.२०% |

स्रोत:- १)भारताची जनगणना २०११, २)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२ जिल्हा नंदुरबार, ३)नवीन जिल्हा सर्वेक्षण रिपोर्ट बडवानी दि. २१/०९/२०२२, ४)जनसांख्यिकी, जिल्हा बडवानी, मध्य प्रदेश शासन, ५)प्रोफाईल ऑफ बडवानी, ६)राज्यस्तरीय पर्यावरण समाघात निर्धारण प्राधिकरण, (म. प्र.)

७)राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5) आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय: NSO (2021 आणि 2022) नुसार, ८)
https://www.researchgate.net/publication/283892402_Dropout_Percentage_of_Scheduled_Caste_Scheduled_Tribe_Children_in_India_A_Decadal_Analysis_up_to_Secondary_level

निरक्षरता ही अनुसूचित जमातींच्या प्रमुख समस्यांपैकी एक आहे. साक्षरतेच्या प्रमाणात नंदुरबार व बडवानी या दोन्ही जिल्ह्यांचा अनुसूचित जमातीतील महिलांचा साक्षरता दर खूपच कमी आहे. बडवानी तर हे प्रमाण निम्याहुन कमी आहे.[८] तर दोन्ही राज्यांच्या शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण ३९.४१% पर्यंत आहे. जे संपूर्ण भारतातील प्रमाण सुद्धा धक्कादायक आकडेवारी समोर आणते. या भागात शिक्षणासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. कारण, फार पूर्वी जमिनीला जे महत्त्व होतं, नंतर व्यापाराला, कालांतराने भांडवलाला आलं, तसं महत्त्व आज ज्ञानाला आहे.[९]

**निष्कर्ष:-**

१)नंदुरबार जिल्हा १६.७ टक्के व बडवानी जिल्हा १४.७% हे या दोन्ही जिल्ह्यात शहरीकरण खूप कमी असल्याचे दिसते. भारताच्या एकूण सरासरी शहरीकरणाशी या जिल्ह्यातील शहरीकरणाची तुलना केली असता ते देशाच्या शहरीकरणापेक्षा दुपटीपेक्षाही कमी असल्याचे दिसते. महाराष्ट्र राज्याच्या शहरीकरणाची (महाराष्ट्र शहरीकरण-४५.८ टक्के) तुलना केल्यास नंदुरबार जिल्ह्यातील शहरीकरणाचे प्रमाण हे जवळपास तीन पटीने कमी आहे. या दोन्ही जिल्ह्यामध्ये आदिवासी लोकसंख्या ही बहुतांश आहे तिचे प्रमाण नंदुरबार जिल्हा ६९.२८% व बडवानी जिल्हा ६९.४२% इतके आहे. देशात ही लोकसंख्या ८.९ % इतकी आहे यावरून हे दोन्ही जिल्हे हे आदिवासी जिल्हे म्हणून ओळख असलेले जिल्हे आहेत.

२)नंदुरबार व बडवानी जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे ७२% व ६१.६% इतके आहे हे प्रमाण खूप अधिक आहे यावरून या जिल्ह्यातील आदिवासी लोकांमधील मागासलेपण व गरिबीची कल्पना येते. देशातील आदिवासी लोकामधील दारिद्र्याचे प्रमाण हे ४५.३% इतके आहे या तुलनेने जिल्ह्यातील दारिद्र्याचे प्रमाण हे गंभीर असल्याचे दिसते. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देखील हे जिल्हे देशाच्या तुलनेने खूपच

मागे असल्याचे दिसतात. देशाचे सरासरी दरडोई उत्पन्न १,४३,००० रुपये इतके आहे तर नंदुरबार व बडवानी जिल्ह्याचे अनुक्रमे ६८,००० व ७१,१४७ रुपये इतके असलेले दिसते ते देशाच्या तुलनेत निम्म्यापेक्षा कमी असल्याचे दिसते. यातही दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे दरडोई उत्पन्न हे चिंताजनक आहे.

३)नंदुरबार जिल्हा व बडवानी जिल्हा या दोन्ही जिल्ह्यामधील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती व तत्सम आहे. उद्योगधंद्याचे प्रमाण हे अत्यंत नगण्य आहे. शेती ही बहुतांश निसर्गावर अवलंबून आहे. मागासलेले तंत्रज्ञान, डोंगराळ शेतीचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने कापूस, भात, तुर, सोयाबीन, उडीद, मुग ही पिके घेतली जातात. काही भागात उसाचे पिक देखील घेतले जाते. जिल्ह्यातील काही लोक खानकाम करण्यासाठी देखील जातात.

४) नंदुरबार जिल्हा व बडवानी जिल्हा या दोन्ही जिल्ह्यात शिक्षणाचे प्रमाण हे खूप कमी आहे. शालेय जीवनात गळतीचे प्रमाण हे लक्षणीय आहे. साक्षरतेचे प्रमाण दोन्ही जिल्ह्यात अनुक्रमे ६४% व ४९% इतके आहे जे देशातील सरासरी साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा हे प्रमाण कमी आहे. भारताचे सरासरी साक्षरता प्रमाण ७७.७% इतके आहे. तर देशातील आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ५९.००% इतके आहे. महिला साक्षरतेचे प्रमाण तर यापेक्षाही चिंताजनक आहे. दोन्ही राज्यांतील साक्षरता दराच्या तुलनेत नंदुरबार व बडवानी जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. एकंदरीत वरील पाहणी वरून हे लक्षात येते की शैक्षणिक दृष्ट्या हे जिल्हे खूप मागास असलेले दिसतात.

५)नंदुरबार जिल्हा व बडवानी जिल्ह्यातील बालमृत्यू चे प्रमाण हे देखील देशातील बालमृत्यू दराच्या तुलनेने खूप अधिक असल्याचे दिसते. अद्ययावत आरोग्य सुविधा जिल्ह्यात उपलब्ध नाहीत. दुर्गम भागात लोकवस्ती असल्यामुळे आरोग्य सुविधा विकसित झाली नाही. आरोग्य केंद्रे आहेत पण आरोग्य कर्मचारी, डॉक्टरची उपलब्धता नाही. यामुळे येथील बालमृत्यू चे प्रमाण अधीक असल्याचे दिसते. परंपरागत विचारसरणी, शिक्षणाचा अभाव यामुळे बाल विवाहाचे प्रमाण खूप अधिक आहे. यातही मुलीमधील बालविवाह हे खूप अधिक आहेत. एकंदरीत हे जिल्हे सर्वांगीण विकास प्रक्रियेत खूप मागे राहिले आहेत.

**उपाययोजना:-**

१)सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व समाजाची प्रगती करण्यासाठी निष्पक्षतेचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाच्या संस्कृती, वनभाज्या, ई. साठी आदिवासी महोत्सव भरवावेत. आदिवासी भागात पर्यटन विकास करावा, आदिवासी भागात दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. या पर्यटनातून आदिवासींच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. वन्य भाज्या, देशी पिके आणि कृषी प्रदर्शनांच्या उत्सवांना प्रोत्साहन देणे, नोकरीसाठी पात्र असलेल्या कुटुंबांना कौशल्य-आधारित प्रशिक्षण देणे, कौशल्य विकास, कंपनीच्या प्रोत्साहनासह सहाय्य, उत्पादणाचे मार्ग वाढवणे, स्वयंरोजगाराच्या संधी सुलभ करणे, उद्योगातील बदल आणि रोजगाराच्या विविध संधींच्या उपलब्धतेवर आधारित बाजार यंत्रणा तयार करणे. थोडक्यात, शहरीकरणाची प्रक्रिया ग्रामीण भागात राबवणे गरजेचे आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास त्यांच्या दरडोई उत्पन्नात आपसुकच वाढ होईल.

२)शाळा आणि समुदाय-आधारित उपक्रमांद्वारे मुले, पालक, शिक्षक यांच्या मध्ये दर्जेदार शिक्षण घेण्याबाबत जनजागृती झाली पाहिजे. तसेच सुदृढ आरोग्याबाबत माता-पिता आणि समुदायातील नेत्यांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. अल्पवयातील विवाह आणि कमी वयात गर्भधारणा याचा हानिकारक परिणाम माता व मुल दोघांच्या वरही होतो याबाबत जाणीव झाली पाहिजे. बहुतांश आदिवासी महिलांना बाळंतपणानंतर आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याने, संतुलित आहार घेणे, व्यायाम करणे, कमी टीव्ही पाहणे, वारंवार तपासणी करणे आणि मुलांचे लसीकरण करणे यासारख्या विषयांवर सांस्कृतिकदृष्ट्या योग्य आरोग्यदायी जीवन शिक्षण साहित्य तयार करून त्यांचे वितरण करायला पाहिजे.

३)आधुनिक शेती पद्धतीबाबत अपुरे ज्ञान, कोरडवाहू शेती, शेती करण्यासाठी भांडवलाचा अभाव यामुळे शेती पारंपारिक पद्धतीने केली जाते ती किफायतशीर ठरत नाही. आदिवासी दुर्गम भागात खते, बियाणे, व कीटकनाशके हे मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त विकली जातात. यासाठी आदिवासी शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक ज्ञान देण्यासाठी शेतीशाळा निर्माण कराव्यात, आदिवासी शेतकऱ्यांना पुरेसे शेतीकर्ज उपलब्ध करून द्यावे. आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना सबसिडीवर उपलब्ध करून द्यावे. शेती बियाणे, खते कीटकनाशक यात भेसळ होणार नाही यासाठी कडक कायदे करून त्यांची अंमलबजावणी करावी. आदिवासी समुदायासाठी निर्माण केलेल्या योजनाचा किती लाभ घेतला जातो? त्याचा परिणाम किती पडला? याचे मूल्यमापन करण्यासाठी एक आयोग स्थापन करावा.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीत केला जात नाही तसेच तंत्रज्ञान शिकण्यासाठी तसे कुशल कामगार देखील उपलब्ध नाहीत. पारंपरिक शेती न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतीत चांगले उत्पन्न मिळवता येऊ शकते. या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी योग्य प्रशिक्षण कौशल्य विकास कार्यक्रम राबवले गेले पाहिजे.

४) विद्यार्थ्यामधील गळती कमी करण्यासाठी आदिवासी कुटुंबामध्ये शिक्षणाविषयी जनजागृती निर्माण करायला पाहिजे.विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकवली गेली पाहिजे, परंतु अध्यापनाची प्राथमिक भाषा म्हणून मातृभाषेचा वापर केला गेला पाहिजे. प्रत्येक वांशिक गटाला त्यांच्या मूळ भाषेत शिक्षण मिळेल हे सुनिश्चित करण्यासाठी, एक विशेष शैक्षणिक धोरण विकसित करणे आवश्यक आहे कारण प्रमाण भाषा ही आदिवासी मुलांना समजण्यास अवघड जाते त्यामुळे त्यांना शिक्षणाची गोडी निर्माण होत नाही. जमातीच्या सदस्यांना त्यांच्या मूळ भाषेत शिक्षण देण्यासाठी सध्या कोणतीही यंत्रणा नाही. स्थानिक पातळीवर शिकलेल्या तरुणांना अशा प्रकारच्या संस्थांमध्ये प्रशिक्षक म्हणून नियुक्त करणे आणि त्यांना आवश्यक प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे.

५)विशेषतः स्थानिक लोकांसाठी एक वेगळी अन्न रणनीती तयार करणे आवश्यक आहे. इतर आवश्यकतांबरोबरच, उच्च-जोखीम असलेल्या गटांसाठी पोषण पुनर्वसन केंद्रांच्या पूरक अन्नपदार्थांमध्ये सुधारणा करणे आणि मुख्य खाद्यपदार्थांचे वितरण उच्च दर्जाचे असणे आवश्यक आहे. हे साहित्य नियुक्त प्रदेशांमध्ये तयार केले जाऊ शकते. आरोग्य, व्यावसायिक आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पोषण आणि आरोग्य शिक्षण देण्यासाठी घरोघरी जावे. आदिवासी औषधांना प्रोत्साहन, सामुदायिक आरोग्य कर्मचारी कार्यक्रम बळकट करणे आवश्यक आहे. नियमित पोषण, आरोग्य मूल्यमापन, पोषण मूल्यमापन अभ्यास करण्यासाठी आणि निष्कर्षांना प्रतिसाद म्हणून आवश्यक ती कारवाई करण्यासाठी आरोग्य कार्यक्रम स्थापन केले पाहिजेत. विशेषतः आदिवासी लोकसंख्येच्या पुनरुत्पादक आरोग्याच्या स्थितीवर सतत देखरेख ठेवून आणि त्यांच्या संरक्षणासाठी अनुवांशिक समुपदेशनाची तरतूद करून, बाल आरोग्य सेवा कार्यक्रमांना प्रभावीपणे वाढवणे आवश्यक आहे.

**संदर्भः-**

१)http://hdl.handle.net/10603/25487

२)http://hdl.handle.net/10603/396790

३) http://hdl.handle.net/10603/413334

४)Tribal Health, Madhya Pradesh 2022-23,

५)भारताची जनगणना २०११

६)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२ जिल्हा नंदुरबार

७)नवीन जिल्हा सर्वेक्षण रिपोर्ट बडवानी दि. २१/०९/२०२२

८)https://www.indiastatpublications.com/District_Factbook/Madhya_Pradesh/Barwani

९)https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC6425764/table/T2/?report=objectonly

१०) भदौरिया जितेंद्रसिंह, मध्य प्रदेश एक परिचय, Mc graw Hill प्रकाशन २०२३,11e

११) The Economic Times Dated: 18 July 2024

१२) State wise data on per capita income, Ministry of Statistics and Programme implementation 2021-22

13) Analytical_series_1_-_child_marrage_in_india_-_Insight_from_NFHS-s_final 2019-21, UNFPA, Analytical paper series-May-2022

१४)राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5) आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय: NSO (2021 आणि 2022)

१५)https://www.researchgate.net/publication/283892402_Dropout_Percentage_of_Scheduled_Caste_Scheduled_Tribe_Children_in_India_A_Decadal_Analysis_up_to_Secondary_level